18-02-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 17-02-2025 22:45 Page 1



महामार्गाविरोधात भोमवासीयांचा पुन्हा निर्धार
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी भारतीय संघाचा सराव सुरू
पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, १८ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 166 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 18 February 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### महाकुंभात पुन्हा अग्नितांडव

**प्रयागराज, दि. १७ :** महाकुंभमधील आगीचे सत्र थांबण्याचे नावच घेत नाही. सोमवारी पुन्हा एकदा महाकुंभ परिसरात सेक्टर ८ मध्ये आग लागली. आगीची माहिती मिळताच अग्निशामक दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत आगीवर विझवण्यास सुरुवात केली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. कल्पवासींनी रिकामे केलेल्या तंबूमध्ये ही आग लागली. आग वेगाने पसरत होती. मात्र अग्नीशमन दलाने परिसराला घेराव घातला आणि शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. आग कशामुळे लागली याबाबत अद्याप माहिती मिळू शकली नाही. दोन दिवसांपूर्वीही महाकुंभमध्ये आगीची घटना घडली होती. या आगीत अनेक तंबू जळून खाक झाले. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागली होती.

### दिल्लीत भूकंपाचे तीव्र धक्के

**नवी दिल्ली, दि. १७ :** दिल्ली-एनसीआरमध्ये सोमवारी सकाळी भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. सुमारे अडीच तासांनंतर बिहारमध्येही बिहारमध्ये ४ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला. सकाळी ८ वाजून २७ मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवल्यानंतर एकच घबराट पसरली. लोक घराबाहेर पडले. आतापर्यंत कोणतीही जीवितहानी किंवा नुकसान झाल्याचे वृत्त नाही. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या माहितीनुसार, भूकंपाचे केंद्र बिहारच्या सिवान जिल्ह्यात होते. सकाळी दिल्ली-एनसीआरमध्ये भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. पहाटे ५.३६ वाजता भूकंप झाला. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्र नुसाररिश्टर स्केलवर याची तीव्रता ४.० इतकी होती. अधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. ७ जानेवारी २०२५ रोजी बिहारमध्ये सकाळी आणि संध्याकाळी दोनदा भूकंपाचे धक्के तीनदा जाणवले होते. पटनासह अनेक जिल्ह्यांमध्ये लोकांना हा भूकंप जास्त जाणवला. भूकंपाचे केंद्र तिबेटच्या झिझांग भागात जमिनीपासून सुमारे १० किमी खाली होते.

### अमेरिकेत महापुरात ९ जणांचा मृत्यू

**वॉशिंग्टन, दि. १७ :** अमेरिकेतील केंटकीमध्ये एका शक्तिशाली वादळामुळे अचानक आलेल्या पुरामुळे रस्ते आणि घरे पाण्याखाली गेली. त्यामुळे नऊ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे, असे गव्हर्नर अँडी बेशियर यांनी सोमवारी सांगितले. आपत्कालीन सेवा शोध आणि बचाव कार्यात गुंतल्या आहेत आणि २४ तासांपेक्षा कमी कालावधीत १,००० हून अधिक लोकांना वाचवण्यात यश आले आहे. त्यांनी वादळाचे वर्णन गेल्या दशकात आपण अनुभवलेल्या सर्वात गंभीर हवामान घटनांपैकी एक असे केले. या झालेल्या वादळामध्ये विविध राज्यांमधील व्हिडिओ फुटेजमध्ये पाण्याखाली गेलेली वाहने, पडलेली झाडे आणि पाण्याखाली गेलेली घरे दाखवण्यात आली आहेत, तसेच टेनेसी, केंटकी आणि व्हर्जिनियामध्ये पुरामुळे रस्ते, व्यवसाय आणि घरे बाधित झाले आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, शनिवारी झालेल्या वादळानंतर केंटकीमध्ये पाण्याची पातळी उच्चांकावर पोहोचली आहे.

### हवामान

कमाल : २७ किमान : २१
आर्द्रता : ७४

### बाजार भाव

सोने : ₹ ८७,५०० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,००,५०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७५,९९९.५० ↑ (३०.२५)
निफ्टी : २२,९५९.५० ↑ (३०.२५)

# मुख्य निवडणूक आयुक्त निवडीबाबत राहुल गांधींचा आक्षेप

## गांधी यांचे आक्षेप निवड समितीने फेटाळले

*नवी दिल्ली, दि. १७ :*

**राजीव कुमार यांच्या मंगळवारी होणाऱ्या निवृत्तीनंतर, मुख्य निवडणूक आयुक्ताच्या नियुक्तीसाठी पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीची बैठक सोमवारी पार पडली. या बैठकीत, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारला मुख्य निवडणूक आयुक्ताची नियुक्ती पुढे ढकलण्याची विनंती केली. त्यांचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रतीक्षेत होता, ज्यामध्ये नवीन कायद्याविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर बुधवारी सुनावणी होणार आहे.**

राहुल गांधी यांचे म्हणणे आहे की, मुख्य निवडणूक आयुक्त निवड समितीत मुख्य न्यायाधीशांचा समावेश असला पाहिजे. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने नवीन कायद्याचा संदर्भ देत राहुल गांधी यांचे आक्षेप फेटाळून लावले.

सरकारी सूत्रांच्या मते, बैठकीत गांधी यांची असहमती नोंदवली असली तरी, नवीन मुख्य निवडणूक आयुक्तांची नियुक्ती लवकरच घोषित होण्याची शक्यता आहे. बैठकीत मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्त यांच्या पदांसाठी प्रत्येकी पाच नावांची पॅनेल समिती समोर ठेवण्यात आली. यामध्ये ज्ञानेश कुमार, जे मंगळवारी निवृत्त होणार आहेत, हे सर्वात वरिष्ठ निवडणूक आयुक्त म्हणून मानले जात आहेत.

गांधी यांचे मत होते की, सर्वोच्च न्यायालयाने निवड समितीच्या रचनेवर दिलेला निर्णय येईपर्यंत नियुक्ती प्रक्रिया पुढे ढकलली पाहिजे. त्यांनी नवीन कायद्याला आव्हान देणारी याचिका दाखल केली असून, सर्वोच्च न्यायालयाने या मुद्द्यावर सुनावणी सुरू केली आहे. हा कायदा मुख्य न्यायाधीशांना निवड समितीच्या सदस्यपदावरून काढून टाकतो, ज्यावर गांधी यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.

नवीन कायद्याअंतर्गत मुख्य निवडणूक आयुक्तांची निवड पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील निवड समिती करणार आहे. यामध्ये लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि पंतप्रधानांनी नियुक्त केलेले कॅबिनेट मंत्री, ज्यामध्ये गृहमंत्री अमित शहा यांचा समावेश आहे, यांचा सहभाग असेल. गांधी यांनी या नवीन प्रक्रियेला विरोध केला असून, पारंपारिक पद्धतीत मुख्य न्यायाधीशाचा समावेश असतो.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर, सरकारने हा कायदा लागू केला. २०१५ ते २०२२ दरम्यान निवड आयुक्तांच्या निवडीच्या अधिकारांवर सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे हे नवीन कायदा अस्तित्वात आला. या कायद्यामुळे मुख्य न्यायाधीशाची भूमिका संपुष्टात आणली गेली आहे, आणि त्याचबरोबर सरकारला निवडीच्या प्रक्रियेत मोठा अधिकार मिळाला आहे.

विरोधकांनी या प्रक्रियेला नियंत्रण आणि विश्वासार्हतेचा प्रश्न म्हणून संबोधित केले आहे. काँग्रेस नेत्यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधी नियुक्ती करण्यात सरकारने घाई केली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजय माकन आणि अभिषेक सिंघवी यांनी याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त केली आणि सरकारच्या कृतीवर टीका केली. यावर माकन म्हणाले की, सरकारला काही दिवस थांबण्याची वेळ होती.

# इंटरनेट पुरवठादार आणि केबल ऑपरेटरना १२.६० कोटींचा दंड

## आणि इन्फ्रा वापर शुल्क भरण्याचेही वीज विभागाचे आदेश

*■ टीम दैनिक हेराल्ड*



पणजी, दि. १७ : वीज विभागाने इंटरनेट सेवा पुरवठादार (आयएसपी) आणि केबल ऑपरेटर यांना तब्बल ₹ १२.६० कोटींचा दंड आकारत पायाभूत सुविधा वापर शुल्क भरावे लागेल, अशी नोटीस बजावली आहे.

वीज विभागाने पाच आयएसपी आणि केबल ऑपरेटरना कारणे दाखवा नोटिसा जारी केल्या असून, वीज खांबांवर केबल टाकल्याच्या बदल्यात भाडे शुल्काच्या व्यतिरिक्त हा अतिरिक्त दंड लावण्यात आला आहे. संबंधित ऑपरेटरना १५ दिवसांच्या आत उत्तर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

वीज विभागाने स्पष्ट केले आहे की वीज खांबांवर फायबर केबल टाकण्याची कोणतीही अधिकृत परवानगी या ऑपरेटर्स कडे नव्हती. तसेच, त्यांनी कोणत्याही प्रकारचा परवाना किंवा एनओसी न घेताच फायबर केबल्स बसवल्या आहेत. त्यामुळे त्यांचा परवानगीसाठी दिलेला अर्ज विभागाने फेटाळला आहे. याआधी विभागाने जानेवारी आणि ३ फेब्रुवारी रोजी दोन वेळा नोटिसा बजावून संबंधित केबल्स काढण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, यावर कोणतीही कारवाई न झाल्याने आता १० दिवसांच्या आत सर्व बेकायदेशीर केबल्स आणि पायाभूत सुविधा हटवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

भूसंपादन आणि मालमत्ता व्यवस्थापन नोडल ऑफिसर यांनी दूरसंचार (मार्गाचा अधिकार) नियम, २०२४ अंतर्गत ही कारवाई केली आहे. वीज विभागाने सांगितले की, सेवा प्रदात्यांनी अनेकदा विनंती करूनही वीज खांबांवर केबल जोडण्याचा कोणताही अर्ज सादर केलेला नाही.यामुळे दोन्ही बाजूंमध्ये तणाव निर्माण झाला असून, वीज विभागाने दंड वसूल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. हा वाद लवकर सुटण्याची शक्यता कमी असल्याचे जाणकारांचे मत आहे.

# अमेरिकेतून हद्दपार झालेल्या तरुणाच्या परतीने सारझोरा गावात खळबळ

*■ टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. १७ :** गोव्यातील सारझोरा गावात अमेरिकेतून हद्दपार झालेल्या तरुणाच्या परतीमुळे मोठी खळबळ उडाली आहे. चांगल्या भविष्यासाठी परदेशी निघालेल्या या तरुणाचे स्वप्न मातीत मिसळले असून, आता तो आर्थिक आणि मानसिक संघर्ष करीत असलेल्या आपल्या कुटुंबात परतला आहे. या तरुणाच्या परतीमुळे गावात भावनांचे काहूर उठले आहे. त्याच्या आगमनाची बातमी समजल्यानंतर अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले. हेराल्ड मीडियाने या प्रकरणाचा मागोवा घेत गावातील स्थानिकांशी संवाद साधला आणि त्याच्या संघर्षाची माहिती घेतली.

शेजाऱ्यांनी या तरुणाचे वर्णन मेहनती आणि कुटुंबवत्सल व्यक्ती म्हणून केले. तो स्वतःच्या तसेच आपल्या कुटुंबाच्या उज्ज्वल भविष्यासाठी अमेरिकेत गेला होता. मात्र, अमेरिकेच्या सीमारेषेवरच त्याचा संघर्ष संपला आणि त्याच्या आशा उद्ध्वस्त झाल्या.

अमेरिकेपर्यंत पोहोचण्याचा त्याचा प्रवास अत्यंत धोकादायक ठरला. मानवी तस्करांच्या तावडीत सापडल्यामुळे त्याने अमानुष छळ सहन केला. अखेरीस, अमेरिकेत प्रवेश मिळण्याआधीच त्याला हद्दपारीचा सामना करावा लागला. या घटनेने त्याचे भविष्य अंधकारमय झाले असून, त्याच्या कुटुंबावरही मोठा भावनिक आणि आर्थिक आघात झाला आहे.

सारझोरा पंचायतीच्या सदस्या सबिता वाझ यांनी हेराल्ड मीडियाशी बोलताना सांगितले, कुटुंबाला मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. हा तरुण त्यांना आधार देण्यासाठी परदेशी गेला होता, मात्र आता परिस्थिती आणखी कठीण झाली आहे. तसेच, त्यांनी गोव्याच्या अनेक तरुणांना भेडसावणाऱ्या मोठ्या समस्येवरही प्रकाश टाकला. गोवा आणि भारतात पुरेशा नोकरीच्या संधी नसल्याने तरुणांना परदेशात जाण्यास भाग पाडले जाते. सरकारने यावर गांभीर्याने विचार करून कायदेशीर आणि सुरक्षित मार्ग उपलब्ध करून द्यायला हवेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

वेळ्ळीचे आमदार क्रूझ सिल्वा यांनीही या प्रकरणाबद्दल चिंता व्यक्त केली. गावकरी या घटनेमुळे चिंतेत आहेत. अनेक गोवेकर अमेरिकेत बेकायदेशीररीत्या राहतात आणि काम करतात. ही समस्या गांभीर्याने सोडवण्याची आवश्यकता आहे, असे ते म्हणाले.

तसेच, केंद्र सरकार आणि अमेरिकन प्रशासनातील सकारात्मक संबंध यावर काही तोडगा काढू शकतात, असेही त्यांनी सुचवले. भारत आणि अमेरिकेच्या सहकार्यामुळे बेकायदेशीरपणे राहणाऱ्या गोवेकरांना मदतीचे काही पर्याय मिळू शकतात, असे त्यांनी सांगितले.

या घटनेने परदेशात चांगले भविष्य शोधू पाहणाऱ्या गोवेकर तरुणांच्या संघर्षावर प्रकाश टाकला आहे. परदेशगमनासाठी धोकादायक आणि अवैध मार्ग स्वीकारण्याच्या मजबुरीमुळे ही समस्या अधिक गंभीर बनत चालली आहे. वेळ्ळीसह संपूर्ण गोव्यात आता सरकारने तातडीने उपाययोजना करून, तरुणांसाठी सुरक्षित आणि कायदेशीर रोजगार संधी उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली जात आहे.

# खूनी विकट भगतला जन्मठेप

## आठ वर्षांनंतर आला न्यायालयाचा निकाल | भगतला ३ वर्षांच्या सक्तमजुरीसह दुहेरी जन्मठेप

*■ टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. १७ :** आयरीश बॅगपॅकर डॅनियली मॅकलॉग्लीन हिची बलात्कार हत्या केल्याच्या आरोपाखाली दोषी ठरलेल्या विकट भगतला न्यायालयाने दोन्ही गुन्ह्यांसाठी दुहेरी जन्मठेप आणि पुरावे नष्ट केल्याच्या कारणावरून तीन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. शिवाय या तिन्ही गुन्ह्यांसाठी ६० हजारांचा दंड ठोठावला.



फाईल फोटो

लिव्हरपूल जॉन मूर्स विद्यापीठाची माजी विद्यार्थिनी असलेली पीडिता डॅनियली मॅकलॉग्लीन ही २०१७ मध्ये काणकोण येथील एका निर्जन शेतात मृतावस्थेत आढळली. बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याचे लक्षात येताच पोलिसांनी तपास सुरू केला. हा तपास पूर्ण होऊन निकाल लागेपर्यंत आठ वर्षे गेली. सरकारी वकीलांनी जरी फाशीच्या शिक्षेची मागणी केली असली तरी उपलब्ध साक्षीपुरावे आणि आरोपीच्या वकीलांनी मांडलेली बाजू लक्षात घेत न्यायालयाने विकटचे हे कृत्य दुर्मिळातील दुर्मिळ नसल्याची नोंद करीत त्याला फाशीची शिक्षा न सुनावता बलात्कार आणि हत्या या दोन्ही गुन्ह्यात दुहेरी जन्मठेप सुनावली. तर पुरावे नष्ट केल्याच्या गुन्ह्याखाली तीन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा सुनावली. या निकालानंतर डॅनियलीच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले आहे.

सरकारी वकील ॲड. संजय सामंत म्हणाले की, ४६ साक्षीदारांची तपासणी करण्यात आली ज्यामुळे दोषी ठरवण्यात आले. विकटला भरतीय दंड संहितेच्या कलम ३०२ नुसार खुनाच्या गुन्ह्यासाठी जन्मठेप व २५ हजार दंड तसेच कलम ३७६ नुसार बलात्कार केल्याच्या गुन्ह्यासाठी जन्मठेप व २५ हजार दंड तसेच कलम २०१ नुसार पुरावा नष्ट केल्या प्रकरणी तीन वर्षे सक्तमजुरी सुनावण्यात आली आहे. साक्षीदारांच्या धमक्या आणि कोविड महामारीच्या काळात अडथळा असूनही, सरकारी पक्ष भगतच्या कपड्यांवर आणि दुचाकीवर रक्त यासारख्या विस्तृत भौतिक पुराव्यांचा वापर करून त्याचा दोष सिद्ध करू शकला.

फिर्यादी पक्षाच्या म्हणण्यानुसार, भगतने पीडितेला रात्री १० ते सकाळी ७ च्या दरम्यान एका निर्जन ठिकाणी नेले जिथे गुन्हा घडला. शवविच्छेदनात मेंदूला गंभीर दुखापत आणि मानेला आकुंचन झाल्याचे दिसून आले, ज्यामुळे तिचा मृत्यू झाला, तसेच तुटलेल्या बाटलीमुळे चेहऱ्यावर आणि डोक्याला गंभीर दुखापत झाल्याचे दिसून आले. भगतच्या मांडीवर आणि मांडीवर झालेल्या जखमांच्या खुणा ( ज्या हल्ल्यादरम्यान झाल्याचे मानले जात होते ) यासह ठोस शारीरिक पुराव्यांमुळे फिर्यादी पक्षाच्या खटल्याला बळकटी मिळाली, .याव्यतिरिक्त, पीडितेच्या कपड्यांवर आणि स्कूटरवर रक्त आढळले आणि त्याच्या काणकोण निवासस्थानाजवळ रक्ताने माखलेले कपडे असलेली एक बॅग सापडली. काणकोण येथे एका आयर्लंड नागरिकावर बलात्कार आणि हत्येप्रकरणी विकट भगतला सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. गेल्या आठवड्यात भगतला या प्रकरणात दोषी ठरवण्यात आले होते. आठ वर्षांहून अधिक काळ चाललेल्या प्रदीर्घ खटल्यानंतर अतिरिक्त सत्र न्यायाधीश क्षमा जोशी यांनी शुक्रवार, १४ फेब्रुवारी २०२५ रोजी दोषी ठरवले होते.

# अंमलबजावणी नाही, एलईडी मासेमारी सुरूच

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १७ :** गोव्यातील पारंपारिक मच्छिमारांनी एलईडी मासेमारी बंदीच्या अंमलबजावणीसाठी सरकारच्या आश्वासनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने (एचसी) कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले असताना, एलईडी मासेमारी अजूनही सुरू असल्याचे दिसून आले आहे.

रविवारी रात्री ८:३० वाजता वास्कोमधील बॅट आयलंडजवळ मच्छिमारांनी एलईडी दिवे वापरणाऱ्या ट्रॉलर्सना पाहिले, आणि याचे व्हिडिओ पुरावे हेराल्डला सादर करण्यात आले आहेत. गोवा फाउंडेशन आणि विविध मच्छिमार संघटनांनी एलईडी मासेमारीवरील जनहित याचिकेवर हायकोर्ट लवकरच निकाल देण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. तथापि, यावर तिळमात्र कारवाई झालेली नाही.

अधिकाऱ्यांवर न्यायालयाने अंमलबजावणीसाठी सौम्य दृष्टिकोन स्वीकारल्याबद्दल कडक टीका केली आहे. उच्च न्यायालयाने सांगितले की, उल्लंघन करणाऱ्यांना उपकरणे जप्त न करता फक्त ५,हजार रुपयांचा दंड ठोठविणे बंदीच्या प्रभावी अंमलबजावणीला धक्का पोहोचवते. भारतीय तटरक्षक दलाने १७ बेकायदेशीर मासेमारी नौकांची ओळख पटवली असूनही, तटरक्षक दलाने केवळ मत्स्यव्यवसाय संचालनालयाला तक्रार केली आहे.

एलईडी मासेमारीने पारंपारिक मच्छिमार समुदायावर गंभीर परिणाम केले आहेत. तीन वर्षांतील मंदीमुळे स्थानिक मच्छिमारांचा व्यवसाय नष्ट होऊ लागला आहे, तसेच, अनेक मच्छिमारांनी हा व्यवसाय सोडला आहे. एलईडी दिव्यांच्या तेजामुळे बेबी किंग कोळंबी, किंगफिश आणि खेकडे सारख्या सागरी प्रजाती आकर्षित होतात, ज्यामुळे नैसर्गिक मासेमारी पद्धतींमध्ये व्यत्यय येतो.



बेकायदेशीर एलईडी मासेमारीच्या नाविन्यपूर्ण युक्त्यांमुळे अंमलबजावणीतील आव्हाने वाढली आहेत. अनेक ट्रॉलर्स मध्यरात्री ते पहाटेच्या दरम्यान सक्रिय होतात आणि खोल पाण्यात ऑपरेशन करतात. व्हिडिओ पुराव्यांची सादरीकरण झाल्यानंतरही पारंपारिक मच्छिमार कारवाईत निष्क्रीयतेचा आरोप करत आहेत.

सध्याच्या कायदेशीर लढाईने अंमलबजावणीमधील पद्धतशीर अडचणी उचलून धरल्या आहेत, आणि काहींनी मत्स्यव्यवसाय विभागाच्या कथित प्रभावामुळे अंमलबजावणीची कमकुवतता सांगितली आहे. जनहित याचिकेत ट्रॉलर्सवरील डिझेल जनरेटर सेटवर बंदी घालण्याची मागणी केली आहे, ज्याचा वापर एलईडी लाईटिंगसाठी केला जातो. पारंपारिक मच्छिमार समुदाय आशा व्यक्त करत आहेत की, उच्च न्यायालयाचा आगामी निकाल एलईडी मासेमारीवरील देशव्यापी बंदीची अंमलबजावणी मजबूत करेल, जेणेकरून त्यांना दिलासा मिळेल.

# ‘महाराष्ट्रात लव्ह जिहाद’ विरोधी कायद्यासाठी विशेष समिती गठीत

**मुंबई, दि. १७ :** महाराष्ट्र सरकारने कथित 'लव्ह जिहाद' आणि जबरदस्तीने किंवा फसवणुकीने होणाऱ्या धर्मांतरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदेशीर अभ्यास करण्याच्या उद्देशाने विशेष समिती नेमली आहे. यामुळे ‘महाराष्ट्र सरकार लव्ह जिहाद’ विरोधात स्वतंत्र कायदा आणणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

महाराष्ट्रातील काही आमदार आणि विविध संघटनांनी सरकारकडे धर्मांतरविरोधी कायदा आणण्याची मागणी केली होती. त्यानुसार, १४ फेब्रुवारी २०२५ रोजी राज्य सरकारने यासंदर्भात महत्त्वपूर्ण शासन निर्णय घेतला. या निर्णयानुसार, पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत गृह, विधी आणि न्याय, सामाजिक न्याय, महिला आणि बालविकास, तसेच अल्पसंख्याक विभागांचे सचिव सदस्य म्हणून असतील. ही समिती महाराष्ट्रातील सध्याच्या परिस्थितीचा अभ्यास करेल, तसेच इतर राज्यांमधील कायद्यांचा आढावा घेऊन आवश्यक शिफारसी करेल. समितीला लव्ह जिहाद' किंवा जबरदस्तीने धर्मांतराच्या घटनांवर उपाययोजना सुचवण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

देशातील ११ राज्यांमध्ये आधीच धर्मांतरविरोधी कायदे अस्तित्वात आहेत. यात गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, कर्नाटक, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, झारखंड, छत्तीसगड, अरुणाचल प्रदेश आणि ओडिशा यांचा समावेश आहे. महाराष्ट्र आता या दिशेने पाऊल उचलणार का, याकडे लक्ष लागले आहे. या प्रस्तावित कायद्याला मुस्लिम सत्यशोधक मंडळाने विरोध दर्शवला आहे. त्यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करत म्हटले की, धर्मांतर विरोधी कायदे आधीच अस्तित्वात असताना नवीन कायदा आणण्याचा हेतू शत्रुत्व वाढवणे आणि राजकीय लाभ मिळवणे हा आहे. तसेच, घरवापसीला प्रोत्साहन देताना 'लव्ह जिहाद' विरोधात कठोर भूमिका घेतली जात असल्याचीही टीका केली आहे. महाराष्ट्र सरकारच्या या वादग्रस्त नव्या कायद्यासंबंधात ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ आणि घटनातज्ज्ञांनी आपापली मते व्यक्त केली आहेत. मुळात कायद्याचा आधार असलेल्या संविधानात 'लव्ह जिहाद' ही संज्ञा नाही, परंतु सरकारला जर यावर कायदा करायचा असेल, तर त्यासाठी विशिष्ट व्याख्या स्पष्ट करावी लागेल. असे काही कायदेतज्ज्ञांचे मत आहे.